मध्यवती संशोधन केंद्र, वाकवली (४१५७११)
प्रशासकीय कार्यालयता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र.मसंके/भासुयो/741/1056/२०२३ दिनांक :— 29 MAR 2023

# जाहिरात

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत भाजीपाला सुधार योजना ८ हे. प्रक्षेत्रावर एकूण ४ विभाग कार्यान्वित आहेत. प्रक्षेत्रावर खरीप, रब्बी व उन्हाळी या तिनही हंगामामध्ये एजन्सी प्रयोग, Product testing trials विद्यापीठ प्रयोग इ. विविध भाजीपाला पिकांची लागवड करण्यात येते. या वर्षीही रब्बी व उन्हाळी, हंगामामध्ये एजन्सी प्रयोग कलिंगड, खरबूज, कोथिंबीर इ. ३० संकरित वाण चाचणीसाठी आलेले आहेत. तसेच पांगारी बिजोत्पादन प्रक्षेत्र, पांगारी वेधशाळेकडील प्रक्षेत्र भाजीपाला बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे अत्यावश्यक असते. सुमारे ८ हे. प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांच्या एजन्सी प्रयोग व बिजोत्पादन लागवडीसाठी जमिनीची पुर्व मशागत करून घेणे, प्लॉटची आखणी करून वाफे तयार करून घेणे, पेरणी/लागवड करून घेणे, पेरणीपासून काढणीपर्यत वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार पिकांची निरिक्षणे घेणे, पिक सरंक्षण विषयक कामे व खत व्यवस्थापन करून घेणे, पाणी नियोजन करून घेणे, काढणी करून घेणे इतर प्रायोगिक कामे करून घेणे, तसेच जणुकवाण संग्रहामधील वाणांची आनुवंशीक शुध्दता जपण्यासाठी स्वपरागीभवन करणे व निरिक्षणे घेणे, भाजीपाला पिकांचे बिजोत्पादन नोंदी ठेवणे मजुरांवर नियंत्रण ठेवणे व त्यांच्याकडुन सुव्यवस्थित कामे करून घेणे या करीता ४ कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक भरणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे अॅव्होकॅडो प्रकल्प प्रक्षेत्रावरील २७० लागवड केलेल्या झाडांची निरिक्षणे घेणे, किटकनाशक व बुरशीनाशक यांची फवारणी करणे, खते देणे, झाडांच्या भोवतलची बेणनी करणे, पाणी व्यवस्थापन करणे इतर दैनंदिन कामकाजासाठी एक प्रक्षेत्र सहाय्यक भरणे आवश्यक आहे. तरी भाजीपाला सुधार योजना प्रक्षेत्रावरील व कार्यालयातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी एप्रील २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीसाठी **पाच कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक** पदे अकरा महिन्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह कृषी पदविका/कृषि पदवी प्रमाणपत्र पात्र उमेदवारांकडून दिनांक १३/०३/२०२२ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यत या कार्यालयास पोहचेल असे अर्ज पाठवावे. लखोटयावर 'कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक' पदासाठी अर्ज असे लिहून **मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (भाजीपाला सुधार योजना विभाग) ता. दापोली जि. रत्नागिरी** या पत्त्यावर हातबटवडा किंवा पोस्टाद्वारे पाठवावे. अर्ज छाननी नंतर पात्र व अपात्र उमेदवाराची यादी मुलाखत दिनांक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचेनाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रति महिना (रू.) | नेमणुकीचा कालावधी | योजनेचेनाव |
|---|---|---|---|---|---|
| १) | कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक | ५ | १५,०००/— | एप्रिल २०२३ ते फेब्रुवारी २०२४ | भाजीपाला सुधार योजना, मसंके, वाकवली अंतर्गत एजन्सी योजनांचे अखर्चित अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत— ४ पदे |
| | | | | | अॅव्होकॅडो प्रकल्प, मसंके., वाकवली — १ पद |

**"कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक" या पदासाठी किमान आवश्यक अर्हता**

| | |
|---|---|
| १. कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक | १. उमेदवार हा कृषि पदविका/कृषि पदविधर असावा.<br>२. **MS-CIT/CCC** संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>३. विद्यापीठ प्रक्षेत्रावरील तसेच कार्यालयीन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

नियम व अटी:

१. वयाची मर्यादा अर्ज दाराचे वय ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे. (अनुसूचीत जाती/जमातीच्या अर्जदारांना नियमानुसार वयाच्या मर्यादे मध्ये सवलत दिली जाईल.)
२. अर्जदाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती भरून मा. संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, यांच्या नावाने व त्यांच्या कार्यालयात दिनांक १४/०४/२०२३ पुर्वी पोहोचतील अशा प्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
३. अर्जाच्या लखोट्यावर **भाजीपाला सुधार योजनेतंर्गत एजन्सी योजनांचे अखर्चित अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत अंतर्गत कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक या पदासाठी अर्ज** असा उल्लेख करावा.
४. पात्र उमेदवारांच्या निवड समितीद्वारे मुलाखती घेण्यात येतील.
५. मुलाखतीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळप्रती सोबत आणाव्या लागतील.
६. मुलाखतीला बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
७. निवड झालेल्या उमेदवाराला नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहित नमुन्यात रू. १००/—रक्कमेच्या बॉन्ड पेपरवर लिहून दयावा लागेल.
८. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.
९. नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या कामाचे संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांचेमार्फत मुल्यमापन करण्यात येईल. सदर उमेदवाराचे काम असमाधानकारक आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या अगोदर समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.
१०.निवड झालेल्या उमेदवाराचा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, या कार्यालयात कायमस्वरूपी नोकरी मिळण्यासाठी कोणताही हक्क राहणार नाही.
११.उमेदवाराला नोकरी सोडावयाची असल्यास त्याने तसेच एक महिना आधि लेखी कळविण्यात यावे तसे न केल्यास त्याचा एक महिन्याचा पगार कापून घेण्यात घेईल.
१२. निम्नस्वाक्षरीकार यांना प्राप्त अर्ज/सर्व अर्ज कोणतेही कारण न दाखविताना कारण्याचे हक्क आहेत.
१३.उमेदवाराला देण्यात आलेली तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती त्याचे वेतन प्रकल्प संपल्यानंतर आपोआप रद्द होईल.

ठिकाण :—वाकवली.
दिनांक :— 24/3/2023

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी.....

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली.
   २/— सदरची नोटीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.
२. ग्रामपंचायत कार्यालय, वाकवली, पांगारी, टेटवली, सुखदर
३. सुचना फलक, संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

## अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | :— | |
| २ | ई— मेल | :— | |
| ३ | पदाचे नाव | :— | |
| ४ | प्रकल्पाचे नाव | :— | |
| ५ | पत्रव्यवहारासाठी पत्ता | :— | |
| ६ | जन्म तारिख | :— | |
| ७ | दिनांक ....... रोजी वय | :— | ...........वर्ष ............... महिने .......... दिवस |
| ८ | धर्म / जात | :— | |
| ९ | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | :— | |
| १० | शैक्षणीक अर्हता | :— | |

| परीक्षा | बोर्ड / महाविद्यालयाचे / शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

११ अनुभव:—

| पदाचे नाव | कालावधी | | कामाचे स्वरूप | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |

१२ इतर:—

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे तसेच सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी पात्र नसेन याची मला जाणीव आहे.

दिनांक:—

ठिकाण:— उमेदवाराची सही

प्रपत्र — अ

## स्वंघोषणापत्र

मी ............................................ श्री ............................................ यांचा मुलगा/ मुलगी वय ........... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ................................ व्यवसाय ...................... राहणार ............................................ याद्वारे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून असल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि /किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:— ................... अर्जदाराची सही:—

दिनांक :— / /२०२ अर्जदाराचे नाव:— ................................................

प्रपत्र — ब

## स्वयं— साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

मी ............................................ श्री ............................................ यांचा मुलगा/ मुलगी वय ........... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ............................... व्यवसाय ...................... राहणार .................................................. याद्वारे घोषित करतो/करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड सहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाणः— ...................       अर्जदाराची सहीः—

दिनांक :—   /   /२०२       अर्जदाराचे नावः— ..............................................